माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : १२१/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री. मुकेश रमेश तिवारी,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, रामटेक ता. रामटेक जि. नागपूर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय रामटेक ता. रामटेक जि. नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग * नागपूर

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २९.०८.२०२४**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| ०९.०८.२०१८ | --- | १५.०६.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) नुसार व्दितीय अपील क्र. २०३६,३७,३८/२०१८, दिनांक ०९.०८.२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २९.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, रामटेक ता. रामटेक जि. नागपूर श्री. राजाराम आडे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय रामटेक ता. रामटेक जि. नागपूर श्री. प्रियेश महाजन उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या **व्दितीय अपील क्र. २०३६/२०१८** मध्ये दिनांक ०९.०८.२०१८ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

“ जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना मुद्दा क्र.२ बाबत फेरफाराची प्रत बाबत निश्चित शहानिशा करुन माहिती देण्यात यावी. अन्यथा, माहिती उपलब्ध नाही, असे त्याबाबत शपथपत्र अपीलार्थीस देण्यात यावे. मुद्दा क्र. ४ बाबत माहितीचा शोध घेवून विनामुल्य पुरविण्यात यावी. तसेच मुद्दा क्र.५ बाबत जमिन अधिग्रहण, देण्यात आलेला मोबदला इत्यादी माहितीचा एका महिन्यात शोध घेवून माहिती उपलब्ध करुन द्यावी. माहिती उपलब्ध होत नसल्यास तसे शपथपत्र अपीलार्थीस देवून त्याची प्रत आयोगास सादर करावी, ” असे आदेशीत करुन प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहे.

तसेच **व्दितीय अपील क्र. २०३७/२०१८** मध्ये दिनांक ०९.०८.२०१८ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

“ अपीलार्थी यांनी जमिन अधिग्रहण केल्यानंतर देण्यात आलेला मोबदला, बँकेचे नाव, ७/१२ च्या नोंदी इत्यादी ३ मुद्यांची माहिती मागितलेली आहे. प्रथम अपीलादरम्यान कार्यालयीन टिप्पणीवर आदेश पारीत करण्यात आले, परंतू वेगळ्या निर्णयाची प्रत देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी पुनश्च एकदा अर्जदारास अर्जात नमूद एकूण ३ मुद्यांची माहिती सदर आदेश प्राप्त होताच ३० दिवसात विनामुल्य द्यावी. माहिती उपलब्ध होत नसल्यास तसे लेखी पत्राव्दारे कळवून त्याची प्रत आयोगास सादर करावी, .” असे आदेशीत करुन प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

तसेच **व्दितीय अपील क्र. २०३८/२०१८** मध्ये दिनांक ०९.०८.२०१८ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

“ अपीलार्थी यांनी वनविभागाच्या जमिनीबाबत एकूण ६ मुद्यांची माहिती मागितलेली आहे. त्यापैकी उपलब्ध मुद्यांची माहिती देण्यात आलेली आहे. प्रथम अपीलादरम्यान कार्यालयीन टिप्पणीवर आदेश पारित करण्यात आले, परंतू वेगळ्या निर्णयाची प्रत देण्यात आलेली नाही. मुद्दा क्र. २ प्रश्नार्थक स्वरुपाचा असून मुद्दा क्र.५ व ६ बाबत अधिकार अभिलेखाची प्रत सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात देण्यात यावी. इतर मुद्यांची माहिती कलम ५(४) व ५(५) नुसार संबंधीत कार्यालयात उपलब्ध असल्यास ती संकलीत करुन अर्जदारास विनामुल्य पुरवावी, नसल्यास तसे लेखी पत्राव्दारे कळवावे.” असे आदेशीत करुन प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

अपील क्र. २०३६/२०१८,२०३७/२०१८,२०३८/२०१८ यात दि. ०९.०८.२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसून देण्यात आलेली माहिती अपूर्ण असल्याचा आक्षेप नोंदवित तसेच त्यांच्या प्रलंबीत महसूल अपीलांमध्ये अप्पर आयुक्त, नागपूर यांच्या समक्ष झालेल्या सुनावणीमध्ये राज्य माहिती आयोग यांनी पारीत केलेल्या आदेशाचा किंवा माहितीचा कुठेही उल्लेख केलेला नाही व सदर शेतजमिन शासनाच्या मालकीची असल्याचा आदेश देवून प्रकरण निकाली काढून त्यांचेविरुध्द अन्याय केलेला असल्याचे नमुद करीत त्यांनी कलम १८ (१) अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

वरील तिनही आदेशाचे अवलोकन केले असता यात मागणी केलेल्या माहितीच्या दस्तावेजांचा पुरवठा याआधिच अपीलार्थी यांना करण्यात आला असून अपीलार्थी यांचा मुळ आक्षेप हा अप्पर आयुक्त नागपूर विभाग यांनी परीत केलेल्या निर्णयाच्या योग्यतेविषयी असून त्यासंबंधी याआधिच अपील क्र. २०३६,२०३७, व २०३८/२०१८ यात दि. ०९.०८.२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशात इतर मुद्यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ अंतर्गत महसुली अपील दाखल करण्यासंबंधी सूचित केले होते. अपीलार्थी यांचे ज्या जमीनीबाबत वाद प्रलंबीत आहेत त्यात महसुली प्राधिकरणांनी महसूल अधिनियम १९६६ अंतर्गत पारीत केलेले आदेश व अपीलांची झालेली सूनावणी ही अर्धन्यायीक स्वरुपाची असल्याने त्यावर कुठलेही भाष्य करणे संयुक्तीक नाही, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम २ (च) अंतर्गत कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती आहे त्या स्वरुपात प्रदान करणे व कलम (८) चा अपवाद वगळता देय असलेली माहिती प्रदान करणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य असून प्रस्तुत प्रकरणी पारीत केलेल्या आदेशाचे अनूपालन झाले असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता दाखल केलेला तक्रार अर्ज हा तथ्यहीन असून फेटाळण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबंध्द करण्यात येत आहे.

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक :** २९.०८.२०२४

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग

जा.क्र. 7295 दि. 4 OCT 2024